
# डॉ. आंबेडकर यशगान आणि

ग्रं. सं. ठाणें
काव्य
. ९३५८
१९५७



# बुद्ध स्तुति

REFBK-0009328
REFBK-0009388

किंमत दोन आणे

# डॉ. आंबेडकर यशगान

आणि

# बुद्धस्तुति

कवि : अनिल भारती

REFBK-0009388

REFBK-0009388

मूल्य २ आणे

सेंट्रल प्रकाशन, चर्नी रोड, मुंबई ४.

## निवेदन—

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाविषयीं जितकें लिहावे तितकें थोडेंच. दलितांच्या सेवेतच ज्यांनीं उभं आयुष्य वेंचलं, त्यांच्याविषयीं आत्यंतिक आदर बाळगून मी ' डॉ. आंबेडकर यशगान ' हें दीर्घ काव्य लिहिलं. सुदैवानें ' नॅशनल रेकॉर्ड ' वर तें ध्वनिमुद्रित सुद्धां झालं. भावगीत गायक गोविंद पोवळे ह्यांच्या आवाजांत तें मूर्त झालं, आणि आज ते प्रसिद्ध होण्याचा योग येत आहे. ' बुद्धस्तुति ' ह्या काव्यांत बौद्धकालीन संस्कृतीचें चित्रण करण्याचा त्याचबरोबर भगवान बुद्धाचा गौरव करण्याचा अल्प प्रयत्न केला आहे. आपण त्यांस गोड मानून घ्याल ही विनंती.

ता. १-१-५७
भायखळा-मुंबई

आपला,
कवि : **अनिल भारती**
६३८ बी. भायखळा स्टे. समोर,
डिलाईल रोड, मुंबई २७.

---

प्रकाशक-**एफ्. बी. बुरहानपूरवाला**, सेंट्रल प्रकाशन
न्यू चर्नीरोड, मुंबई ४.
मुद्रक-**कृ. ना. सापळे**, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
त्रिभुवन रोड, मुंबई ४.

अनुक्रम २२४०८ ....... दि:
क्रमांक ....... नों दि:

# डॉ. आंबेडकर यशगान

गाऊंया किर्तीगान—गर्जवूया आसमान
जय जय भीमराया तव नांम अमर जाहले ।।
तोडण्यास दावे दांभिक रूढींचे यावे
पोटीं रामजीच्या तें पुत्ररत्न चौदावे
एक्याण्णव सालीं जन्म शतक एकोणीसावे
कोंकणच्या भूमिनें खचित धन्य व्हावे
बालभीम ज्ञानसाधनेंत पूर्ण रंगले ।। १ ।।

जय जय....

जीवनयात्रा महान यात्रिक तोही महान
दंभचूर्ण करणारी वज्रमूठ तीही जाण
कांटेरी वाट चालताना येई तुफान

एक आस बाबांना मिळवावे उच्च ज्ञान
होता प्रयाण मुंबईला इष्टमित्र गहिंवरले ॥२॥

जय जय....

केळुसकर गुरुजींचे आशिर्वाद लाभले
उच्च शिक्षणांत भीमराव यशस्वी झाले
महाराज सयाजी त्यांच्या सहाय्यास धांवले
परदेशी जाऊनीया जगन्मान्य पावले
अर्थशास्त्र, कायद्यांत बुद्धिनिपुण शोभले

॥ ३ ॥ जयजय....

"हा महार, शूद्र आणि चांडाळ हा
शिवूं नका मूर्तिमंत रे विटाळ हा
उच्चवर्णीयांत अरे, ये, खुशाल हा

जडाला जणूं संजीवन तें मिळाले
अमंगळ मनीं भाव होते जळाले ॥ १२ ॥

किती स्तूप आणि किती ती विहारे
झडूं लागले शांततेचे नगारे
आणि 'तक्षशीला' उघडून दारे
म्हणूं लागली 'ज्ञान देते मी यारे' ॥१३॥

सहजीवनाची अमर पंचशीला
बंधुत्व सोपें शिकवी जगाला
एकेक 'भिक्षू' जणूं पाठशाला
'पूर्वेस' नवधर्म उदयास आला ॥१४॥

हा शांतीचा घोष घुमता जगांत
पडली न प्रेतें पुन्हां संगरांत
करी 'प्रेम' द्वेषावरी अंतीं मात
प्रज्वलीत झाली पुन्हां सत्य ज्योत ॥१५॥

करावी किती बुद्धदेवा स्तुती मी ?
देऊं कशी भक्तीचक्रा गती मी ?
संसारी पडलों नसेरे यती मी
कसा येऊं तुझीया चरणाप्रती मी ? ॥१६॥

कमलपुष्प हातीं सदा हुंगणारी
मुखें प्रेमधर्मा जगा सांगणारी
तुझी मूर्त ती चिंतनी गुंगणारी
दिनदु:खीतासाठीं कीं झुंजणारी ॥१७॥

जडावा तुझ्या दर्शनाचाच छंद
तुटावेत हे मोहपाशाचे बंध
सदा दरवळूं दे तुझा किर्तीगंध
ठसावी तुझी मूर्ती हृदयीं अखंड ॥१८॥

अजंठा नी वेरूळ वदती कहाण्या
गुंफा नी ह्या कैक कोरीवलेण्या

सौंदर्य लेवून ह्या शिल्पराण्या
उभ्या कैक वर्षे तुझें गीत गाण्या ॥१९॥

इथें जागतें शिल्प साकार होते
कलेच्याच द्वारें तुझें गीत गाते
कलावंत झाले चिरंजीव येथें
फुटें येथ वाचा मुक्या पथ्थरातें ॥२०॥

तुझ्यासाठीं समदृष्टीचा लाभ व्हावा
मनीं, द्वेष, क्रोधास थारा नसावा
अहंकार पायीं तुझ्याचीं नमावा
तुझ्यासाठीं हा देह माझा झिजावा ॥२१॥

तुझें गीत गाता मला मृत्यू यावा
तुझ्यासाठीं हा देह कृतकृत्य व्हावा
तुझ्यापाशीं मजला मिळावा विसावा
कुशीचा प्रभो ! तव निवारा मिळावा ॥२२॥

ध्यानीं तुझ्या नेत्र मिटतात माझे
मनोमंदीरीं तव प्रतिमा विराजे
तुझें नांव साऱ्या त्रिखंडांत गाजे
तुझ्या तत्वज्ञानास वैराग्य साजे ॥ २३ ॥

आम्ही दीन आलों तुझ्या आज दारीं
ये, दंभ, ढोंगाची आम्हा शिसारी
तुझ्या तत्वज्ञानास जो अंगिकारी
नको त्यास कोणी लफंगा पूजारी ॥२४॥

नमो बुद्धदेवा ! नमो शांती दूता !
कुंठित झाली मति गूण गाता
सदोदीत गाऊं तुझी "प्रीत गाथा"
तूं भाग्य आमुचें नी तूंही "विधाता" ॥२५॥

२३८८

**• समाप्त •**

राठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दिं: ........................
REFBK-0009388
REFBK-0009388

## आमचे लोकप्रिय प्रकाशन !

कवि साहेबराव कोकाटे यांनी लिहिलेली आणि
विठ्ठल शिंदे यांनी गाईलेली.

# डॉ. आंबेडकरांना काव्य फुलांची श्रद्धांजली

पृष्ठें १६ मुखपृष्ठावर बुद्धवासी
बाबासाहेबांचे एकरंगी चित्र

किंमत फक्त ३ आणे

मि ळ ण्या चे ठि का ण

## सेंट्रल प्रकाशन मुंबई ४.


मुखपृष्ठ छपाई : आशा प्रिंटरी : मुंबई ४.